# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०७/२०२४ (गुरूवार) दुपार**

### अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक १७/०७/२०२४ रोजी पोस्टे बेला येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता यातील **आरोपी नामे— गजानन देवराव ऐरचे, वय ५१ वर्ष रा. चिचघाट त. हिंगनघाट जि. वर्धा ह. मू कवडापूर त. उमरेड जि. नागपूर** हा मौजा कवडापूर बस स्टॉप जवळ एका बोरीमध्ये देशी दारू बाळगुन विक्री करताना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून देशी दारूने भरलेल्या सिलबंद ०७ निपा प्रत्येकी १८० एम एल एकूण एम एल १२६० एम एल किंमती ४९० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दि. १७/०७/२०२४ रोजी पोस्टे बोरी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, धवलपेठ येथे **आरोपी नामे— अंबीर सुधाकर काकडे वय २९ वर्ष रा. धवळपेठ ता. जि नागपुर** याचे पानठेल्यामध्ये दारूबाबत रेड केली असता आरोपीचे पानठेल्यामध्ये पांढऱ्या रंगाचे प्लास्टिक चुमडीत देशी दारूच्या निपा दिसुन आल्याने चुमडीची झडती घेतली असता त्यात १३ निपा भिंगरी कंपनीच्या देशी दारूच्या प्रत्येकी १८० एमएल एकुण एमएल २३४० प्रति निप कीमती ७० रू प्रमाणे ९१० रू चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

तसेच **आरोपी नामे— अजय रामश्लोक राय, वय ४९ वर्ष रा. वार्ड क्र. ०४ बुट्टीबोरी ता. जि. नागपुर** हा मौजा धवलपेठ येथे गोयल कंपनीच्या गेटसमोरील पानठेल्यामधुन अवैद्यरीत्या दारू विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून धवलपेठ येथील गोयल कंपनीच्या गेटसमोर असलेल्या पानठेल्यामध्ये दारूबाबत रेड केली असता पानठेल्याच्या मागे एक शेंदरी रंगाच्या प्लास्टिक चुमडीमध्ये देशी दारूच्या १४ निपा भिंगरी कंपनीच्या देशी दारूच्या प्रत्येकी १८० एम एल एकुण एम एल २५२० प्रति निप कींमती ७० रू प्रमाणे ९८० रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १७/०७/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ भिवापूर हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या गोपनीय खबरेवरून मौजा धर्मापूर भिवापूर येथे **आरोपी नामे— करण नरेंद्र धनविजय, वय २४ वर्ष, रा. धर्मापूर भिवापूर ता. भिवापूर** हा घटनास्थळी उभा राहुन अवैद्यरीत्या दारूची विक्री करीत आहे. अशा खबरेवरून रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून १८० एम एल नी भरलेल्या ०६ देशि दारू च्या निपा किमती ४२० रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे कुही येथील स्टाफ यांना मुखबिरद्वारे गोपनीय खबर मिळाली की, **आरोपी अमीत गौतम शेंन्डे, वय ३६ वर्ष रा. आजनी पोस्ट नवेगाव ईसापूर ता. कुही जि. नागपूर** हा कुही पाचगाव रोड ओपन जिम जवळ अवैद्यरीत्या विनापरवाना देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खबरेवरून कुही पाचगाव रोड ओपन जिम जवळ रेड कारवाई करून त्या ठिकाणी आरोपी जवळ एका नायलॉनच्या पांढऱ्या चुमडीमध्ये भिंगरी संत्रा क्रमांक—१, १८० एम.एल मापाच्या १४ निप, विक्री किंमती प्रती निपा ७० रूपये प्रमाणे एकुण किंमती ९८० रूपया चा माल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता जयस्वाल देशी दारू दुकानाचे शेजारील बंद पानठेल्यावर **आरोपी दिलदारसिंग मायासिंग भादा वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र. १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर** हा देशी

दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खबरेवरून रेड कारवाई करून देशी दारू भिंगरी संत्रा नं १ च्या प्रत्येकी १८० एमएल च्या ८ प्लास्टिक निपा एकुण १४४० एम एल च्या प्रत्येक निप किंमत ७० रू प्रमाणे असा एकुण ५६० रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गुप्त माहिती मिळाली की, आरोपी प्रशांत वासूदेव वसू वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र ०१ केळवद ता. सावनेर हा मौजा केळवद बाजार चौक येथे अवैद्यरीत्या दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खबरेवरून घटनास्थळी जावून आरोपीची अंगझडती घेतली असता त्याचे जवळील कापडी पिशवीत देशी दारू भिंगरी सत्रा न. ०१ च्या १२ निपा प्रत्येकी किमती ७०/—रू. प्रमाणे एकुण कि. ८४०/— रू. चा मुद्देमाल अवैद्यरीत्या बाळगताना मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे रामटेक हद्दीत महिला आरोपी ही न्यु. फुलझरी रामटेक येथे आरोपीचे घराचे मागे असलेले वाडीमध्ये २० लीटर मोहफूल गावठी दारू प्रत्येकी ५० रू लीटर प्रमाणे एकूण १०००/— रू. चा मुद्देमाल बाळगताना मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे मौदा अंतर्गत **आरोपी राकेश रतनलाल यादव वय ३४ वर्ष, रा. आर्यन ढाबा (शाहू ढाबा) माथनी, मौदा** हा माथनी येथील आर्यन धाब्याच्या समोर देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशी खबर मिळाल्याने आर्यन धाब्याजवळ जावुन रेड कारवाई केली असता आरोपीचे ताब्यातून ३० निपा देशी दारूच्या प्रत्येकी ९० मिली एकूण २७०० मिली प्रती किमती ८० रू प्रमाणे असा एकूण २४००/—रू चा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

तसेच **आरोपी रायभान सेवक सपाटे, वय ३६ वर्ष, रा. चिरव्हा ता. मौदा** हा चिरव्हा गावात त्याच्या चिकन दुकानासमोर अवैद्यरीत्या विनापरवाना दारू विक्री करीत आहे. अशा माहिती वरून पोस्टे मौदा येथील स्टाफ यांनी चिरव्हा गावातील नांदगाव रोडवर असलेल्या चिकन दुकानाजवळ रेड कारवाई करून आरोपीच्या हातात असलेल्या नायलॉन थैलीची दारूबाबत झडती घेतली असता त्यामध्ये ०६ निपा देशी दारूच्या प्रत्येकी १८० मिली एकूण १०८० मिली प्रती किंमती ८०/— रू प्रमाणे असा एकूण ४८०/—रू. चा मुद्देमाल मिळून आला.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**